नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/12/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## पो.स्टे. बेला हद्दीमधील मौजा पोही शेत शिवार येथील जुगार अड्डयावर धाड

## —: पोलीस स्टेशन बेला नागपुर ग्रामीणची कारवाई :—

दिनांक २८/१२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन बेला येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन बेला येथील मौजा पोही शेत शिवार परिसरात काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोलीस स्टेशन बेला येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर पथकाने मौजा पोही शेत शिवार येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) राजु सदाशिव राउत, वय ५० वर्ष, रा. सावरखेडा त. समुद्पुर जि. वर्धा २) मोरेश्वर देवगीरी गिरी, वय ४२ वर्ष, रा. महागाव ता. समुद्रपुर जि. वर्धा ३) अर्पण अशोकराव कांबळे वय ३२ वर्ष, सावरखेडा त. समुद्पुर जि. वर्धा ४) नितेश श्रीहरी झाडे, वय ३० वर्ष रा. रामा ता. जि. नागपुर पाहीजे आरोपी ५) राहुल शंकर म्हैसकर रा. बेला ६) नितीन पिसे रा. बेला ७) मो सा. क्र. एम एच —३२/के.—४५६२ चा चालक** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०७ जुगारी इसम त्यांचे ताब्यातुन १) नगदी ४२१७०/— रुपये २) ४ नग मोबाईल किंमती १४०००/— रुपये ३) ४ मोटारसाईकल किंमती ६८०००/— रुपये ४) जुगार खेळण्याकरीता वापरण्यात आलेले साहित्य व ५२ ताशपत्ते किंमती २६००/— रुपये असा एकुण १२६७७०/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे बेला येथे अप. क्र. ४३२/२३ कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन बेला येथील ठाणेदार सपोनि अजित कदम, पोलीस उपनिरीक्षक अजय चौधरी, पोहवा शैलेंद्र मानकर, सुहास माचटवार, तुलाराम चटप यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## घरफोडी

**पो.स्टे. सावनेर** :- अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील वार्ड क्र. २ पाटणसावंगी येथे दिनांक २२/१२/२०२३ चे १२.०० वा. ते दिनांक २८/१२/२०२३ चे ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे- लक्ष्मण उपासराव पराते, वय ६४ वर्षे, रा. वार्ड क्र. २ पाटणसावंगी हा आपल्या घराच्या दाराला इंटर लॉक व कुलुप लावुन घर बंद करून आपल्या मुलीला भेटण्याकरीता भद्रावति जि. चंद्रपुर येथे आपल्या पत्नीसह गेला असता यातिल कोणीतरी अज्ञात चोराने त्याच्या बंद घराचे लाकडी इंटर लॉक व कुलुप तोडून घरात प्रवेश करून घरातील बेडरूममधील लाकडी व लोखंडी आलमारीचे लॉकर मध्ये ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस स्टेशन सावनेर येथील ठाणेदार श्री. रविन्द्र मानकर यांनी भेट दिली असुन अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार शेरे पो.स्टे. सावनेर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**